दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी बुधवार दि.१७ डिसेंबर २०२५ 9422660077 आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष ३ रे अंक ११५ पाने ४ किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi Wednesday 17 December 2025 9422660077 RNI-MAHMAR / 2023 / 87555 Year - 3rd Issue 115 Pages 4 Rate 4 Rs

## मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होणार नाही

**मुंबई**–भाजपने मराठी माणसांची मुंबई गिळंकृत करण्याचा डाव रचल्याचा आरोप ठाकरे गटाने केला आहे. त्यावर ते म्हणाले, मला असे वाटते की ज्यांच्याकडे मुद्दे नाहीत, तसे असे असत्य, खोटे व भ्रम पसरवण्याचे काम करत आहेत. मुंबई मराठी माणसांची आहे. मुंबई महाराष्ट्राचीच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले आहे की, जोपर्यंत चंद्र, सूर्य, तारे आहेत तोपर्यंत मुंबई कुणीही हिंमत केली तरी भाजप व महायुती त्याचा विरोध करेल. मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याची भूमिका जो कुणी घेईल त्याच्याविरोधात आम्ही उभे राहू, संघर्ष करू, तसेच ती भूमिका मांडणाऱ्याला ती भूमिका मांडूही देणार नाही. आता याविषयी काहीजण असत्य बोलत आहेत. खोटे बोलत आहेत.

# काँग्रेसच्या मतांचे विभाजन करण्यासाठीच अजित पवारांचे 'एकला चलो'-विजय वडेट्टीवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात महापालिका निवडणुकांची घोषणा झाली. या निवडणुकांमध्ये भाजप आणि शिंदे यांची युती असणार पण अजित पवारांचा पक्ष नसणार, हा महायुतीचा डाव आहे. सत्तेचा मलिदा खाताना अजित पवारांचा पक्ष चालतो पण निवडणुकीत काँग्रेसच्या सेक्युलर मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवार यांचा पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवणार महायुतीची ही रणनीती आहे. हे जनतेला समजते अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.मुंबई माध्यमांशी बोलताना काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी महायुतीवर सडकून टीका केली. हसन मुश्रीफ यांना कॅबिनेट मंत्री करायचे त्यांच्याबरोबर चहा नाश्ता करायचा आणि निवडणूक आली की नवाब मलिक यांचा मुद्दा पुढे करून युतीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला दूर ठेवायचे हा दुटप्पीपणा आहे. निवडणुकीत हिंदुत्वाच्या मुद्दा पुढे करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाला जवळ करायचे आणि मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवार यांना स्वतंत्र निवडणूक लढवायला लावायची, महायुतीचे हे राजकारण लपून राहिलेले नाही. हिंदू विरुद्ध मुस्लिम केल्याशिवाय भाजप निवडणुका जिंकू शकत नाही म्हणून निवडणुका आल्या की हा वाद निर्माण केला जातो अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले अस भाजप सांगत होती. आता महापालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत. पण उद्या कोर्टात जाऊन पुन्हा ओबीसींच्या जागांवरील निवडणुका रद्द झाल्या, त्यांचे प्रतिनिधित्व कमी झाले तर ही जबाबदारी कुणाची? निवडणुका झाल्या तरी ओबीसींवर टांगती तलवार आहे त्यांच्या जागांवर वरवंटा फिरणार आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.



### महाविकास आघाडी एकत्र राहणार का?

**राज्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतविभाजन होऊ नये आणि भाजपला त्याचा फायदा होऊ नये अशी भूमिका सर्वांची आहे. महाविकास आघाडी एकत्र राहणार का? याबाबत स्थानिक नेते आणि पदाधिकारी निर्णय घेतील. स्थानिक नेते तिथली समीकरण पाहून निर्णय घेतील अस वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.**

# शासकीय तंत्रनिकेतन,बीडच्या मुद्रण तंत्रज्ञान विभागाच घवघवीत यश

## २४ विद्यार्थ्यांची पर्कसन्स व इपीएल कंपनी मध्ये निवड

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथील मुद्रण तंत्रज्ञान विभागाच्या तृतीय वर्ष २०२५ मधील एकूण २४ विद्यार्थ्यांची देशातील नामांकित पर्कसन्स पॅकेजिंग एसेल प्रोपॅक लिमिटेड या अग्रगण्य कंपन्यांमध्ये यशस्वी प्लेसमेंट झाली आहे. विभागाने १०० टक्के प्लेसमेंटची उज्ज्वल कामगिरी साध्य केल्याने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या उल्लेखनीय यशामागे विभागप्रमुख ए.एस. जाधव सर यांचे मार्गदर्शन तसेच अधिव्याख्याते आठवले आर. सी. व श्रीमती एन. ए. बोधे यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांना उद्योगसंगत अभ्यासक्रम, प्रत्यक्ष प्रशिक्षण (प्रॅक्टिकल ट्रेनिंग) आणि मुलाखतपूर्व तयारी यावर विशेष भर देण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट प्रक्रियेत उत्कृष्ट कामगिरी केली.



संस्थेचे प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, मुद्रण तंत्रज्ञान विभागाची दर्जेदार शैक्षणिक कामगिरी आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे शासकीय तंत्रनिकेतन, बीडचे नाव मुद्रण उद्योग क्षेत्रात उज्ज्वल झाले आहे. भविष्यातही आमचे विद्यार्थी उद्योगक्षेत्रात यशस्वीपणे चमकत राहतील, याचा आम्हाला अभिमान आहे. १०० टक्के प्लेसमेंट झाल्याबद्दल सहसंचालक डॉ. के. बी. लाढाने यांनी विद्यार्थी, विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले. या यशामुळे संस्थेत आनंदाचे वातावरण असून पुढील शैक्षणिक वर्षात अधिकाधिक नामांकित कंपन्या प्लेसमेंटसाठी सहभागी होत आहेत. तसेच विद्यार्थ्यांची मागणी वाढत असल्याने मुद्रण तंत्रज्ञान विभागाची प्रवेश क्षमता वाढवण्याची आवश्यकता असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# परळी शहरातील धम्मभूषण राजेंद्र जगतकर इंडियन आर्मी मध्ये निवडी बद्दल भव्य नागरी सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**परळी | प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील युवकाची इंडियन आर्मी मध्ये निवड झाल्याबद्दल भीमनगर वासिया तर्फे भव्य नागरी सत्कार करण्यात आला असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाप्रसिद्धीप्रमुख तथा साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की भीम नगर जगतकर गल्ली येथील राजेंद्र जगन्नाथ जगतकर यांचे चिरंजीव धम्मभूषण राजेंद्र जगतकर यांनी अथक परिश्रम घेऊन व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून एक जिद्द अंगाशी बाळगून अभ्यास करून इंडियन आर्मी मध्ये त्याची निवड झाली या निवडीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून त्याची व त्याच्या आई-वडिलांची भव्य अशी मिरवणूक काढून व पेढे वाटून त्याचा नागरी सत्कार वंचित बहुजन युवक आघाडीचे शहराध्यक्ष प्रेम जगतकर व त्यांच्या पत्नी रमा जगतकर



यांच्या हस्ते त्यांच्या आई-वडिलांचा तर निवृत्त पोलीस उपनिरीक्षक आनंदजी बनसोडे व परळी नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक शंकरराव साळवे यांच्या हस्ते धम्मभूषण यांचा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी प्रा. विलास रोडे यांनी विद्यार्थी घडवण्यासाठी आई-वडिलांनी लक्ष देणे ही काळाची गरज आहे असे सांगितले. तर या कार्यक्रमास प्रा. विलास रोडे, विलास आदोडे, विलास जगतकर, राजाभाऊ जगतकर, अशोक जगतकर, जितेंद्र जगतकर, राज जगतकर, नितीन जगतकर, दिनेश जगतकर, धर्मराज जगतकर, सारनाथ जगतकर, अभिषेक सातसमुद्रे, संकेत बनसोडे, अविनाश जगतकर, नारायण सावंत, महेंद्र जगतकर, रवींद्र जगतकर, निखिल गोदाम, अशोक हनवते, आत्माराम जगतकर, राज जगतकर, बॉक्सर जगतकर, अर्जुन जगतकर, बाबासाहेब साळवे, भैय्यासाहेब हनवते इत्यादी सह महिला पुरुष इत्यादी शेकडो जण उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सिद्धार्थ जगतकर यांनी केले तर आभार प्रदर्शन वंचित बहुजन युवक आघाडीचे शहराध्यक्ष प्रेम जगतकर यांनी केले.

# सागराच्या लाटांवर नंदुरबारचा 'देव' स्वार; १० किमी सागरी जलतरणात राज्यात आठवा

## नंदुरबार जिल्ह्यातील पहिलाच मानकरी; मालवणच्या समुद्रकिनाऱ्यावर कोरले यशाचे नाव

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबारच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवत, येथील उदयोन्मुख जलतरणपटू देव अभयसिंग राजपूत याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे आयोजित राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या १० किलोमीटर अंतराच्या स्पर्धेत देवने संपूर्ण महाराष्ट्रातून ८ वा (आठवा) क्रमांक पटकावून 'टॉप टेन' मध्ये स्थान मिळवले. अशा प्रकारचा बहुमान मिळवणारा तो जिल्ह्यातील पहिलाच जलतरणपटू ठरला आहे.

महाराष्ट्र राज्य जलतरण संघटना आणि सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटनेच्या वतीने मालवण येथील चिवला बीचवर १५ व्या राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १३ व १४ डिसेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह एकूण ८ राज्यांतील सुमारे १,५०० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. समुद्राच्या लाटा आणि प्रवाहाचा सामना करत देव राजपूतने १४ वर्षे वयोगटात १० किलोमीटरचे अंतर यशस्वीपणे पूर्ण केले.

**अक्षरा पाटीलचीही यशस्वी झुंज:**–याच स्पर्धेत नंदुरबारच्या अक्षरा उमाकांत पाटील हिने देखील पहिल्यांदाच सहभाग नोंदवत ३




किलोमीटर सागरी अंतर यशस्वीरित्या पार केले. तिच्या या जिद्दीचेही सर्वत्र कौतुक होत आहे. देव राजपूत याच्या या घवघवीत यशाबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटनेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते त्याचा रोख रक्कम आणि भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. देवने यापूर्वी नाशिक विभागाचे दोनदा प्रतिनिधित्व केले असून, शॉर्ट आणि लाँग इव्हेंटमध्ये त्याने आपली चमक दाखवली आहे.

या यशामागे देवची जिद्द आणि त्याच्या पालकांचे पाठबळ आहे. तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे जलतरण तलावाचे व्यवस्थापक व प्रशिक्षक अमोल भोयर, राहुल काळे, रणजित गावित आणि अमित गावित यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून दोन्ही खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बेटकबिलोली येथे विठ्ठल रुक्मिणीच्या चाळीस व्या वाढदिवसा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भव्य लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**नायगांव | हानुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील बेटकबिलोली येथील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या हनुमान मंदिर येथे विठ्ठल रुक्मिणीच्या चाळीसव्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी दिनांक १५ डिसेंबर ते २२ डिसेंबर पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण व भव्य लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा ६ ते ७ रूद्रअभिषेक ८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,१० ते ११ गाथा भजन, दुपारी २ ते ४ प्रवचन ४ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते ११ हरिकिर्तन व हरिजागर महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार, गुणीजन गायक वादक, भजनी मंडळ, २१ डिसेंबर रोजी भव्य लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळा व महाप्रसाद आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळ बेटकबिलोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# माता रमाई व तुलसी नर्सिंग कॉलेज मध्ये फ्रेशर्स डे उत्साहात साजरा

## नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमांतून जंगी स्वागत

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

येथील माता रमाई कॉलेज ऑफ नर्सिंग व तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दिनांक १५ रोजी नर्सिंग शिक्षणात पाऊल टाकणाऱ्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी भव्य फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.डी. राऊत उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्थेचे विश्वस्त



डॉ.सुनील जोंधळे, प्रा.संजय खाडे, डॉ.विकास वाघमारे, प्रा.शिल्पा बोराडे यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डी.डी. राऊत यांनी नर्सिंग क्षेत्रातील सेवाभाव, शिस्त आणि जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे प्रा.अर्जुन राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी रॅम्पवॉक, संगीत, गायन, मिमिक्री, एकपात्री अभिनय व समूह नृत्य अशा जोशपूर्ण सादरीकरणांद्वारे कार्यक्रमाला रंगत आणली. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नवप्रवेशितांचे मनापासून स्वागत करत स्नेहाची नवी नाळ जुळवली. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची बहारदार उधळण करत संपूर्ण सभागृह भारावून टाकले.या कार्यक्रमाचे नियोजन द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत यशस्वीपणे केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिया चक्रे आणि श्रेया कोरडे यांनी केले तर आभार प्रा.अब्रार पठाण यांनी मानले. यावेळी दोन्ही महाविद्यालयांतील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय

# मैत्रीचा नवा अध्याय

कोणत्याही पक्षाचे सरकार असले, तरी भारत-रशिया संबंधांमध्ये सातत्य आहे. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात अमेरिकेशी संबंध अधिक मजबूत झाले असले, तरी रशियाशी बिघडले नाहीत. आता डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे अमेरिकेशी भारताचे संबंध बिघडले असताना रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतिन यांनी भारताचा दौरा केला. या परिषदेत मोदी यांच्याबरोबर झालेल्या १९ करारांमधून मैत्रीचा नवा अध्याय लिहिला गेला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत वार्षिक शिखर परिषदेसाठी व्लादीमिर पुतिन भारतात येणे ही जागतिक राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड आहे. त्याचे कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाशी केलेल्या कच्च्या तेल खरेदीमुळे भारतावर अतिरिक्त शुल्क आकारले. ट्रम्प रशिया आणि भारताची कोंडी करत असताना पुतिन यांनी भारतात येऊन कच्च्या तेलाचा पुरवठा अखंड सुरू ठेवण्याची हमी देणे तसेच पुतिन यांचे भारतात पोहोचण्याआधीच रशियाच्या संसदेने संरक्षण करारावर सह्या करणे या बाबी ट्रम्प यांच्या निर्बंधाला आपण जुमानत नाही, असा संदेश देणाऱ्या होत्या. भारत-रशिया भागीदारी ही काही स्थिर, हितसंबंधांवर आधारित संबंधांपैकी एक आहे. त्यात व्यापक भू-राजकीय परिदृश्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता आहे. संरक्षण सहकार्य हा पुतिन यांच्या भेटीचा केंद्रबिंदू राहिला आहे, जो भारत-रशिया संबंधांचा दीर्घकालीन आणि मजबूत पाया आहे. विस्तारित श्रेणी, सुधारित अचूकता आणि हायपरसोनिक तंत्रज्ञानातील उदयोन्मुख सहकार्यासह भारत-रशिया संरक्षण भागीदारी एका नवीन तांत्रिक युगात प्रवेश करत आहे. भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेचा विस्तार आणि लढाऊ विमान वाहतूक आणि पाणबुडी तंत्रज्ञानातील सखोल सहकार्यावरील चर्चा या दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारीप्रती वचनबद्धता दर्शवते.

या सर्वोच्च पातळीवर संरक्षण संबंधांना मान्यता देऊन भारत आपली धोरणात्मक स्वायत्तता मजबूत करतो. अमेरिकेशी मजबूत संबंध निर्माण करत असताना आणि 'क्वाड'मध्ये सक्रियपणे सहभागी होत असताना भारताने कधीही कोणत्याही एका शक्तीला त्याचे धोरण ठरवू दिलेले नाही. हा बहुआयामी दृष्टिकोन एक स्पष्ट जागतिक संदेश देतो. भारताला वैचारिक गटांमध्ये अडकवले जाऊ शकत नाही. त्याऐवजी, तो आपल्या राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणारी विविध संरक्षण भागीदारी राखेल. भारताचे सातत्यपूर्ण संरक्षण हित रशियाला आशियामध्ये धोरणात्मक प्रभाव राखण्यास मदत करते आणि चीनवर जास्त अवलंबून राहण्यापासून रोखते. त्यामुळे हळूहळू जागतिक शक्ती संतुलन बदलू शकते. तथापि, भारत-रशिया संबंधांचे खरे परिवर्तन व्यापार, शुल्क, ऊर्जा प्रवाह आणि उदयोन्मुख आर्थिक संरचनांच्या क्षेत्रात पाहायला मिळत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारत-रशियामध्ये द्विपक्षीय व्यापार वाढला आहे. तो प्रामुख्याने रशियाकडून भारताच्या स्वस्त कच्चे तेल, खते, कोळसा आणि आवश्यक खनिजांच्या आयातीमुळे चालतो. रशियाने आशियामध्ये ऊर्जा निर्यातीत केलेल्या बदलामुळे भारताला स्पर्धात्मक किमतीत दीर्घकालीन ऊर्जापुरवठा सुरक्षित करण्याची एक अनोखी संधी मिळाली आहे. हे बदल केवळ आर्थिकच नाही, तर भू-राजकीयदेखील आहे. पाश्चात्त्य देशांच्या नापसंतीला न जुमानता, रशियाकडून तेल खरेदी करून, भारताने आपले सार्वभौमत्व पुन्हा सिद्ध केले आणि महागाईप्रवण संकटापासून आपल्या अर्थव्यवस्थेचे रक्षण केले. तथापि, या व्यापार वाढीमुळे सतत असमतोल उघड झाला आहे. भारत रशियाला तुलनेने कमी निर्यात करतो. त्यामुळे रशियन बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात रुपया अधिशेष जमा झाला आहे. पुतिन यांच्या भेटीत आता दोन्ही देशांमध्ये शंभर अब्ज डॉलरचा व्यापार करार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. डॉलर मजबूत होत असताना भारत आणि रशियाचा व्यापार रुपया-रुबल किंवा स्थानिक चलन सेटलमेंटचा वापर डॉलर-आधारित प्रणालीवरील अवलंबित्व कमी करू शकतो, जी निर्बंधांप्रती असुरक्षित आहे. भारतीय औषधनिर्माण, यंत्रसामग्री, कृषी उत्पादने आणि आयटी सेवांसाठी बाजारपेठेतील प्रवेश वाढवणे व्यापार असंतुलन सुधारण्यास मदत करू शकते. व्यापक दृष्टिकोनातून पाहता हे बदल डॉलर-आधारित वित्तीय प्रणालीपासून दूर जाण्याचे संकेत देतात. भारत आणि रशिया नवीन आर्थिक मार्ग शोधत आहेत, जे व्यापक 'ब्रिक्स' आणि जागतिक दक्षिणेला पर्यायी पेमेंट सिस्टीम तयार करण्यास प्रेरित करू शकतात. अशा यंत्रणा दोन्ही देशांच्या आर्थिक सार्वभौमत्वाला बळकटी देतील. त्यामुळे त्यांना पाश्चात्त्य-प्रेरित व्यापार राजकारणाला अधिक प्रभावीपणे सामोरे जाता येईल. सांस्कृतिक सहकार्य हे भारत-रशिया संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. संरक्षण करार आणि ऊर्जा करारांपूर्वी, सिनेमा, साहित्य आणि संगीत त्यांच्या संबंधांचा पाया होता. एके काळी राज कपूरच्या चित्रपटांनी सोव्हिएत थिएटर भरली होती. टॉल्सटॉय आणि दोस्तोव्हस्कीसारख्या रशियन अभिजात कलाकृतींनी भारतीय लेखकांवर खोलवर प्रभाव पाडला. हा सांस्कृतिक पूल आजही महोत्सव, शैक्षणिक देवाण-घेवाण, नाट्य सहयोग, भाषा कार्यक्रम आणि सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळांद्वारे जिवंत आहे. पुतिन यांच्या भेटीमुळे डिजिटल प्लॅटफॉर्म, सह-निर्मित चित्रपट आणि संग्रहालय भागीदारीद्वारे या सांस्कृतिक सहकार्याला आधुनिकीकरण करण्याची संधी मिळाली. भारत-रशिया सहकार्याचा एक नवीन आणि वेगाने वाढणारा आधारस्तंभ म्हणजे शैक्षणिक आणि मानवी संसाधन देवाण-घेवाण. पुतिन यांची भेट केवळ औपचारिक नाही, तर दोन्ही देशांसाठी खोल धोरणात्मक महत्त्वाने भरलेली आहे. पाश्चात्त्य अलिप्ततेच्या प्रयत्नांना न जुमानता, रशियाचे जगभरात मजबूत, सार्वभौम भागीदार आहेत, हे या भेटीतून ठसवण्याचा रशियाचा प्रयत्न होता. बहुध्रुवीय जगात दोन्ही देश आपली भूमिका पार पाडत असताना, होणारे सहकार्य केवळ त्यांचीच स्थिती मजबूत करणार नाही, तर जागतिक शक्ती गतिमानतेचे भविष्यदेखील आकार देईल. भारत आणि रशियामधील संबंध जवळजवळ आठ दशकांपासून आहेत आणि दोन्ही देशांनी नेहमीच सहकार्यासाठी दारे उघडी ठेवली आहेत. पुतिन यांचा दोन दिवसांचा भारत दौरा हा भारत-रशिया संबंध मजबूत करण्यासाठी एक नवीन टप्पा ठरला. तथापि, ज्या परिस्थितीत पुतिन यांनी या वेळी भारताला भेट दिली, भारताची भूमिका खुल्या मनाने समजून घेतली आणि सहकार्य मजबूत करण्यासाठी एकत्र काम करण्यास सहमती दर्शविली, ती महत्त्वाची आहे. अमेरिकेने दंडात्मक शुल्क आणि निर्बंधांच्या अलीकडच्या घोषणेमुळे एक जटिल आंतरराष्ट्रीय परिस्थिती निर्माण केली आहे. परिणामी, प्रभावित देशांना आता नवीन पर्याय शोधण्याचे आव्हान भेडसावत आहे.या संदर्भात, भारत आणि रशियाने दोन्ही देशांमधील विद्यमान आर्थिक आणि व्यापार भागीदारी मजबूत करण्यासाठी पंचवार्षिक योजनेवर सहमती दर्शवली. दोन्ही देशांमध्ये नेहमीच पारंपरिक मैत्री राहिली आहे, परस्पर आणि दीर्घकालीन हितसंबंधांवर आधारित संबंधांव्यतिरिक्त भारत-रशियामध्ये अनेक मुद्द्यांवर नूतनीकरण करार झाला. पुतिन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर संरक्षण, व्यापार, ऊर्जा आणि आर्थिक सहकार्य यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये भागीदारी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे या दोन देशांमधील वार्षिक द्विपक्षीय व्यापार शंभर अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. नवोपक्रमासाठी लोकांची वाढती जागतिक गरज लक्षात घेता दोन करार झाले. त्यामुळे दोन्ही देशांमधील मानवी श्रमांची हालचाल नवीन शक्ती आणि संधीचे साधन बनेल. दोन्ही बाजूंनी सुरक्षा, अर्थव्यवस्था, व्यापार आणि संस्कृती या क्षेत्रात सहकार्याला प्राधान्य देण्याचा संकल्प केला आहे. भविष्यात नवीन भू-राजकीय परिस्थिती उद्भवू शकते; परंतु केवळ एक न्याय्य आणि बहुध्रुवीय जगच नवीन जागतिक आव्हानांना तोंड देऊ शकेल. यामध्ये रशिया आणि भारत यांच्यातील सहकार्य महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

# आयुष्यभर जनतेचे सेवक म्हणून काम करणारे अमृत काका सारडा

## १२ महिने सुख दु:खात उभा राहणारे एकमेव 'अमृत काका'

## बीड शहरात दानशूर व्यक्तिमत्व म्हणून अमृत काकांची ओळख

दैनिक वादळ वार्ता

बीड नगरपालिकेची निवडणूक संपली मात्र प्रभाग क्रमांक ०३ मधील निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. या प्रभागातून भाजप पक्षाकडून माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा हे निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) गटाचे अमर नाईकवाडे हे निवडणूक लढवत आहेत. मात्र माजी नगरसेवक असलेले अमर नाईकवाडे यांची लढत यावेळी अमृत काका सारडा यांच्याशी काँटे की टक्कर होणार असल्याने याकडे सर्व बीड शहराचे लक्ष लागले आहे. मात्र या निवडणुकीत अमृत काका सारडा यांचे पारडे जड मानले जात आहे. अमृत काका. कायमच जनतेत राहून त्यांच्या सुख दु:खात धाऊन जात मदत करत असतात. त्यांची बीड शहरात दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ओळख आहे. पेठ बीड भागात वेगळे स्टेडियम असावे यासाठीअमृत काकांनी वारंवार मागणी धरली होती. आणि त्यांच्याच पाठपुराव्यातून खंडेश्वर मंदिर परिसरात अडीच एकर जागेमध्ये माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या माध्यमातून ग्रामीण स्टेडियम उभारले. नगरपालिकेच्या माध्यमातून पाठपुरावा करत आठवडी बाजार सुरू केला. पेठ बीड भागात अग्निशामक दल व्हावे यासाठी प्रयत्न करून पेठ बीड भागातील ८० ते ९० हजारांसाठी लोकांसाठी अग्निशामक दल सुरू केले. अमृत काका यांनी आदित्य हॉस्पिटल, आदित्य महाविद्यालय, जिनिंग या माध्यमातून गोर गरीब वंचित लोकांसाठी कायमच मदतीचा हात दिला आहे. कोणत्याही जातीचा धर्माचा माणूस मदतीच्या आशेने काकांकडे गेला तर तो निराश होऊन परत येत नाही. कारण अमृत काका त्यांच्यापरीने सर्वतोपरी मदत करूनच ती व्यक्तीची अडचण सोडवून प्रश्न मार्गी लावत असतात. अशा या जनसेवकाला जनतेने नगरसेवक म्हणून नगरपालिकेच्या पाठवावं. अमृत काका जर निवडून गेले तर त्यांच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील दांडगा अनुभव पाहता उपनगराध्यक्ष किंवा सभापती नक्कीच होतील. राज्याच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पेठ बीड चा विकास करण्यासाठी अमृतकाका यांना पेठ बीड भागातील मतदार मायबाप नक्कीच निवडून देतील.

**सारडा चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून स्मशानभूमीमध्ये नवीन शवदेह वाहिनी बसविल्या**

स्मशानभूमी मध्ये अनेक दुरवस्था झाली होती. सन २०१६ ते २०२१ याकाळात तत्कालीन नगरसेवक असो किंवा सन २०२१प्रशासक असो



यांनी लक्ष न दिल्यामुळे स्मशानभूमी मधील शवदेह वाहिनी तुटल्या होत्या. त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. मात्र अमृत काका सारडा यांनी सारडा चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून दोन ठिकाणी शवदेह वाहिन्या बसवून दिल्या.

**कोरोना काळात ३०० बेड असलेले आदित्य हॉस्पिटल कोरोना रुग्णांसाठी शासनाला विनामूल्य दिले**

कोरोना काळात देखील अमृत काकांनी सामाजिक कार्य करत लोकांसाठी धाऊन गेले होते. ७०० ते ८०० लोकांना अन्नदानाचे छत्र चालवले. ३०० बेड ची व्यवस्था असलेल्या आदित्य हॉस्पिटल च्या माध्यमातून शासनाला विनामूल्य कोरोना रुग्णांसाठी जागा उपलब्ध करून देत सेवा करण्याचं काम अमृत काकांनी केलं आहे.

**पेठ बीड विकास कृती समितीच्या माध्यमातून सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य**

अनेक वर्षांपासून अमृत काका सारडा हे पेठ बीड शहर विकास समितीच्या माध्यमातून सामाजिक कार्यात कायमच अग्रेसर राहिले आहेत. पेठ बीड भागातील सर्व जाती धर्मातील युवकांना सोबत घेऊन पायाभूत, मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी तत्पर असतात. सामाजिक उपक्रम राबवून गोर गरीब जनतेला मदतीचा हात देत असतात. त्यामुळे त्यांनी लोकांचा विश्वास जिंकला आहे. त्यांच्या सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कार्य हेच त्यांची जमेची बाजू मानली जात आहे. म्हणूनच प्रभाग क्रमांक ०३ मधील जनता ३० वर्षांपासून सामाजिक राजकीय क्षेत्राच्या मध्यातून जनतेच्या सेवेत कार्यरत असलेले अमृत काकांना मोठ्या मताधिक्याने विजयी करणार असे चित्र पाहावयास मिळत आहे.

# आरोग्य शिक्षणातून सुदृढ पिढी! मेंढवड येथे विद्यार्थ्यांसाठी हात धुण्याचे प्रात्यक्षिक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सद्गुरू कृपा बहुउद्देशीय संस्था, मेंढवड ता. तळोदा यांच्या वतीने येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिक्षण व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व आणि स्वच्छतेचे फायदे सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष महेंद्र वळवी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य किती महत्त्वाचे आहे आणि ते कसे जपायचे याबद्दल मार्गदर्शन केले. आरोग्याची काळजी घेण्यासाठी लहान-सहान सवयी कशा परिणामकारक ठरतात, हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'हात धुणे' याचा प्रात्यक्षिक प्रयोग. विद्यार्थ्यांना रोगांपासून दूर राहण्यासाठी आणि शरीर निरोगी ठेवण्यासाठी हात धुण्याची योग्य पद्धत या ठिकाणी करून दाखवण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जमदाडे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याच्या फायद्यांविषयी मार्गदर्शन केले. स्वच्छ आणि निरोगी राहिल्यास अभ्यासामध्ये लक्ष लागते, आजारपण कमी होते आणि शाळेतील उपस्थिती वाढते. यामुळे मुलांचे भविष्य अधिक उज्वल होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक जमदाडे यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष जगदीश तडवी आणि संचालक सदस्य सुभाष वळवी, दिनू पाडवी यांचे सहकार्य लाभले. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक भगरे सर यांच्यासह शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगरे सर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच स्वच्छतेच्या सवयी रुजवून त्यांना संसर्गजन्य रोगांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. उत्तम आरोग्य हीच खरी संपत्ती असून, फक्त हात धुण्यासारख्या साध्या कृतीतून मोठी आरोग्यविषयक क्रांती घडू शकते, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



# गेवराईतील सामाजिक कार्यकर्त्यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या कष्टाने शेती व्यवसाय करत मुलांना शिक्षण देतात. मात्र आज शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने अनेक शेतकरी पुत्रांनी शहरी भागात छोटे-मोठे व्यवसाय सुरू करत आहेत. स्वत:च्या पायावर स्वाभिमानाने उभा राहण्याचा प्रयत्न करत असलेल्या शेतकरी पुत्रांच्या व्यवसायाला ग्राहकांनी साथ द्यावी आणि युवकांना व्यवसायाकडे जाण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे आवाहन गेवराईतील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.शिक्षण घेऊनही विविध क्षेत्रात प्रयत्नानंतरही नोकरी मिळत नसल्याने गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी पुत्रांनी शहरी भागात येऊन



छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले आहेत. यात कापड दुकान, किराणा, जनरल स्टोअर्स, चहाचे हॉटेल यांचा समावेश आहे. यासोबतच लाईट फिटिंग, नळ फिटिंग, मोटार रिवाइंडिंग आदी कामेही स्वाभिमानाने करत आहेत. यापैकीच कोल्हेर येथील चंद्रसेन जाधव आणि त्यांची मुले सुनील जाधव व राजेश जाधव यांनी गेवराई शहरात श्री सुधन गुळ प्रॉडक्ट विक्री केंद्र कोल्हेर रोड येथे सुरू केले आहे. साखरेपासून होणारे आजार थांबवायचे असतील तर दैनंदिन जीवनात गोडी निर्माण करणाऱ्या गूळ आणि गुळाच्या पदार्थांचा वापर करावा असे आवाहन करत जाधव बंधूंनी गुळापासून बनलेले वेगवेगळे पदार्थ विक्रीसाठी ठेवले आहेत. या केंद्राला शहरातील सामाजिक कार्यकर्ते डॉ अनिल दाभाडे, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, व्याख्याते ड कल्याणराव काळे, सामाजिक कार्यकर्ते मुरलीधर घोडके, सुरेश टोणपे आदींनी भेट देऊन साहित्य खरेदी करत त्यांना प्रोत्साहन दिले. शेतकरी पुत्रांना व्यवसायात बळ देण्यासाठी ग्राहकांनी साथ द्यावी असे आवाहनही यांनी त्यांच्याकडून करण्यात आले आहे.

# राज्य स्तरीय खो-खो महासंग्रामासाठी बीड सज्ज-४ क्रीडांगणे भव्य प्रेक्षक गॅलरी; अजिंक्यपद स्पर्धेची युद्धपातळीवर तयारी

दैनिक वादळ वार्ता

१८ ते २१ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बीड शहर पूर्णपणे सज्ज झाले असून आयोजकांकडून युद्धपातळीवर तयारी सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

स्पर्धा स्थळ असलेल्या श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात एकाच वेळी सुरळीत सामने पार पडावेत यासाठी ४ स्वतंत्र क्रीडांगणे सज्ज करण्यात येत आहेत. मापदंडानुसार आखणी आणि योग्य प्रकाशयोजना यामुळे खेळाडूंना सर्वोत्तम खेळाचे वातावरण मिळणार आहे.प्रेक्षकांसाठी सुरक्षित व प्रशस्त गॅलरी व्यवस्था उभारण्यात येत असून, राज्यभरातून येणाऱ्या क्रीडाप्रेमींना थरारक सामने आरामात पाहता येतील. स्पर्धेच्या चारही दिवसांत मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.खेळाडू, प्रशिक्षक व अधिकाऱ्यांसाठी स्वच्छ, पौष्टिक व वेळेवर भोजन व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच बीड शहरात ये-जा सुलभ व्हावी यासाठी वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था आणि समन्वय पथके तैनात करण्यात आली आहेत.या स्पर्धेमुळे केवळ उत्कृष्ट खेळाडूंची निवडच होणार नाही, तर बीडच्या क्रीडा व्यवस्थापन क्षमतेचे दर्शन घडणार असल्याचे सांगून, ही स्पर्धा संस्मरणीय ठरेल, असा विश्वास शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मार्गदर्शक प्रा. जनार्दन शेळके यांनी व्यक्त केला. प्रा. जे. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष - ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे,सचिव - विजय जाहेर , राज्य प्रसिद्धी समिती सदस्य प्रा . राजेंद्र बरकसे, अविशांत कुमकर यांच्यासह वर्षा कच्छवा, योगेश सोळसे, मनोज जोगदंड, कैलास गवते, अनिल शेळके, माधव जायगुडे, बंडू घोरड अमोल सांगुळे, प्रफुल्ल हाटवटे , नितीन फुटवाड, रमेश पिसाळ, सुधीर हजारे, नितीन येळवे, अंकुश गायकवाड, संदिप हांगे , बापू तारुकर , ठोकरे, राऊत, घरत यादव, मुंजाराम निरडे, सोमनाथ मंडलिक, छत्रभूज ढेंबरे आदी कार्यकर्ते ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत.



# आपला प्रशासकीय विभाग, निवासी संकुल, वाणिज्यिक आस्थापना रुग्णालय, शाळा, उपाहारगृह, उद्यान, बाजारपेठ परिसर स्वच्छ ठेवा

## ४ कोटी २० लाख रुपयांचे पुरस्कार जिंका





दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेडून जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता मंथन' स्पर्धेचे आयोजन.नामांकित व्यक्ती (सेलिब्रिटी), नागरिकांनी एखादा परिसर किंवा गृहनिर्माण संस्थांनी आसपासचा परिसर दत्तक घेऊन स्वच्छता करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार.नागरिक, खासगी आस्थापनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,मुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आवाहन. बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगरे) क्षेत्र अधिक स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने दिनांक १ जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छता मंथन' स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्वच्छ प्रशासकीय विभाग (वॉर्ड), स्वच्छ निवासी संकुल, स्वच्छ झोपडपट्टी परिसर, स्वच्छ वाणिज्यिक आस्थापना, स्वच्छ रुग्णालय (शासकीय व खासगी), स्वच्छ शाळा (शासकीय व खासगी), स्वच्छ उपाहारगृह (रेस्टॉरंट), स्वच्छ सामुदायिक शौचालय, स्वच्छ रस्ते / मार्ग, स्वच्छ उद्यान आणि मोकळ्या जागा, स्वच्छ बाजार परिसर तसेच आसपासचा परिसर स्वच्छतेसाठी दत्तक घेणे अशा विविध गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येईल. या विविध गटांसाठी एकूण ४ कोटी २० लाख रुपयांचे पुरस्कार असतील. प्रत्येक गटांतील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना रोख पुरस्कार आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेच्या माध्यमातून नामांकित व्यक्ती (सेलिब्रिटी), नागरिकांना एखादा परिसर किंवा गृहनिर्माण संस्थांना आसपासचा परिसर दत्तक घेऊन तेथील स्वच्छता राखण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. नागरिक आणि खासगी आस्थापनांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री (मुंबई शहर) एकनाथ शिंदे यांनी केले आहे.'स्वच्छता मंथन' स्पर्धेसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात सादरीकरण करण्यात आले. ही स्पर्धा प्रशासनाने संपूर्ण मुंबई महानगरात अत्यंत प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण गगराणी यांनी दिले.बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) . किरण दिघावकर यांच्या देखरेखीत बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि उपनगरे) क्षेत्रात स्वच्छतेच्या दृष्टीने निरनिराळे उपाययोजना केल्या जात आहेत तसेच विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबईत स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी 'स्वच्छता मंथन' स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासकीय विभाग (वॉर्ड) आणि त्या परिसरात वास्तव्यास असलेल्या नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य वृद्धिंगत करणे तसेच मुंबईला अधिक स्वच्छ आणि सुंदर करण्याच्या उद्देशाने 'स्वच्छता मंथन' स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. स्वच्छ प्रशासकीय विभाग (वॉर्ड), स्वच्छ निवासी संकुल, स्वच्छ झोपडपट्टी परिसर, स्वच्छ वाणिज्यिक आस्थापना, स्वच्छ रुग्णालय (शासकीय व खासगी), स्वच्छ उपाहारगृह (रेस्टॉरंट), स्वच्छ सामुदायिक शौचालय, स्वच्छ रस्ते/मार्ग, स्वच्छ उद्यान आणि मोकळ्या जागा, स्वच्छ बाजार परिसर तसेच आसपासचा परिसर स्वच्छतेसाठी दत्तक घेणे या विविध गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येईल. स्वच्छ प्रशासकीय विभाग (वॉर्ड) गटात प्रथम ५० लाख रुपये, द्वितीय २५ लाख रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १५ लाख रुपयांचा निधी दिला जाईल. स्वच्छ निवासी संकुल गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ झोपडपट्टी परिसर गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ वाणिज्यिक आस्थापना गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ रुग्णालय (शासकीय व खासगी) गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ शाळा (शासकीय व खासगी) गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ उपाहारगृह गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ सामुदायिक शौचालय गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ रस्ता / मार्ग गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ उद्यान आणि मोकळ्या जागा गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये; स्वच्छ बाजारपेठ परिसर गटात प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये पुरस्कार राहील. तर, आसपासचा परिसर स्वच्छतेसाठी दत्तक घेणे या विशेष गटासाठी प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १० लाख रुपये, तृतीय ५ लाख रुपये पुरस्कार राहील. या संपूर्ण स्पर्धेचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत डिसेंबर २०२६ मध्ये भव्य पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येईल. सुप्रसिद्ध सिनेअभिनेते अक्षयकुमार यांनी या सर्व उपक्रमांत स्वत:हून सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. चित्रपट, क्रीडा व अन्य क्षेत्रातील नामांकित व्यक्ती (सेलिब्रिटी), नागरिक आदींनी एखादा परिसर दत्तक घ्यावा आणि इतरांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व स्वच्छता राखण्यासाठी प्रोत्साहित करावे. गृहनिर्माण संस्थांनी सभोवतालचा परिसर दत्तक घेऊन तेथील स्वच्छता राखावी. स्पर्धेसाठी अर्ज करण्याची पद्धत, स्पर्धेसाठीचे विविध प्रवर्ग (कॅटेगरी), पुरस्कारांचा तपशील आणि अन्य तपशील लवकरच जाहीर करण्यात येईल. या स्पर्धेत नागरिक, खासगी आस्थापना आदींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि 'स्वच्छ व सुंदर मुंबई'साठी प्रशासनाकडून सुरू असलेल्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहनदेखील मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी केले आहे.

# वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन




दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कुटुंबाचे प्रमुख आदरणीय पद्मविभूषण मा.खा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने अहिल्यानगर शहरात यशोदानगर पाईपलाईन रोड या ठिकाणी भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, निलेश मालपाणी, राम झिने, रामदास वाणी, प्रशांत दरेकर, अमोल खाडे, गौरव भोसले, शिवाजीराव भोसले, राधाताई झिने, प्रतिक्षा शिंदे यांचेसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

यावेळी अभिषेक कळमकर म्हणाले की, आदरणीय पवार साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदानशिबीर आयोजित केले आहे. रक्तदान हेच सर्वोकृष्ट जीवनदान आहे. रक्तदाना प्रति जागरुकता वाढवणे गरजेचे आहे. गरजूंना वेळेवर, सुरक्षित आणि योग्य रक्त मिळावे यासाठी नेहमी तयार असले पाहिजे. आपण सर्वांनीच रक्तदान करायला हवे. युवांमध्ये आणि नागरिकांमध्ये सेवा भाव जागृत करणे हे प्रमुख ध्येय या उपक्रमातून साध्य करता येते. आज विद्रुप केलेल्या राजकारणाच्या गोंगाटातही मा.शरदचंद्र पवार साहेबांनी घडविलेली विचारसरणी, दिलेला संघर्षाचा मंत्र आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी केलेले अविरत प्रयत्न हीच आपली खरी ओळख आणि श्वास आहे. आपला सहभाग म्हणजे आदरणीय पवार साहेबांप्रती कृतज्ञतेची थोर परंपरा जीवंत ठेवणे, समाजासाठी घेतलेला प्रत्येक छोटा प्रयत्न मोठा बदल घडवू शकतो अशा भावना अभिषेक कळमकर यांप्रसंगी व्यक्त केल्या.

तसेच राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने जिल्हा शासकीय रुग्णालयातील गोरगरीब रुग्णांना थंडीपासून दिलासा मिळावा यासाठी ब्लँकेटचे वाटप करण्यात आले होते.यावेळी महिला अध्यक्षा नलिनी गायकवाड, नीता बर्वे, लता शिरोळे, मोनाश्री अहिरे, हेलन पाटोळे, आशिष इरमे, रवी सातपुते उपस्थित होते.

यावेळी नलिनी गायकवाड म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्तीला मुलभूत गरजा मिळाव्यात हिच बांधिलकी जोपासण्याचे काम आदरणीय पवार साहेब यांचे नेतृत्वाखाली आम्ही आज करत आहोत.समाजातील प्रत्येक व्यक्तीने गरजूंसाठी एक मदतीचा हात पुढे केल्यास अशा सामाजिक उपक्रमांना अधिक बळ मिळते.

आदरणीय मा.खा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पक्षाच्या वतीने जिल्हाभरात मोठ्या उत्साहात व अभिमानाने सर्वत्र साजरा करण्यात आला.

# अंनिस'ची डॉ.बाबा आढाव यांना आदरांजली




दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

डॉ.बाबा आढाव यांनी असंघटीत कामगारांना एकत्र करून लाखो कामगारांचे जीवन बदलले.

ते फक्त एक व्यक्ती किंवा नेते नव्हते तर तो एक सामाजिक विचार आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष सेवानिवृत्त पोलिस अधिकारी बाबासाहेब बुधवंत यांनी केले. सामाजिक चळवळींचा स्वास, कष्टकऱ्यांचा आधारवड डॉ. बाबा आढाव यांना आदरांजली वाहण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा शाखा व सर्व समविचारी संघटनांच्या वतीने शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता गुलमोहर चौक,सावेडी येथील श्री.बुधवंत यांचे निवासस्थानी आयोजित श्रध्दांजली सभेत श्री.बुधवंत बोलत होते.

जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारूळे, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे,भारतभूषण भागवत, रविंद्र सातपुते आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ.बाबा आढाव यांच्या सोबतीने काम करण्याची संधी कशी मिळाली याबाबत विष्णू गायकवाड, भारतभूषण भागवत, प्रमोद भारूळे, विनायक सापा, रविंद्र सातपुते, देवदत्त साळवे यांनी आपाआपले अनुभव कथन करून भावपूर्ण आदरांजली व्यक्त केली.

# कामे करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या पाठीशी नागरिकांनी उभे रहावे



दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

केडगाव, प्रभाग क्रमांक १७ मधील दूधसागर सोसायटी परिसरात ड्रेनेज लाईनच्या कामाचा शुभारंभ सर्व नागरिकांच्या उपस्थितीत पार पडला. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निधीतून व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

दूधसागर सोसायटी परिसरात अनेक वर्षापासून ड्रेनेज लाईनच्या कामाचा प्रश्न भेडसावत होता. ३० लाख रुपये खर्चाच्या या कामास मंजूरी मिळून सदरचे काम सुरु झाले आहे. या परिसरात विकासकामे प्रलंबित होती. माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या निधीतून यापूर्वी डांबरीकरणाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच गणपती मंदिरासाठी १० लाख रुपयांचा सभामंडप उपलब्ध करुन देण्यात आला. अनेक विकास कामे विखे यांच्या माध्यमातून मार्गी लावण्यात आली असून, प्रलंबित कामेही पूर्ण होणार आहेत. महानगरपालिका निवडणुकीचे वातावरण तयार झाले असले तरी, प्रत्यक्ष विकासनिधी आणून कामे करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या पाठीशी नागरिकांनी उभे राहण्याचे आवाहन उद्योजक जालिंदर कोतकर यांनी केले आहे.

विकासकामे करण्यासाठी सातत्याने पाठपुराव्याची गरज भासते. फक्त निवडून येऊन विकास कामे होत नाही, काम करणारा नगरसेवकाची या प्रभागाला गरज आहे. यासाठी काम करणाऱ्याच्या मागे जनता उभी असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी प्रशांत चितळे, राजाराम काळे, पोपट खताळ, अशोक शिनगान, सौरभ सुनकुळे, सुवर्णा मिसाळ, अंबाबाई ओहोळ, सुवर्णा सहाने, बंदी काळपुंड,,दीपक रोकडे,,वर्षा चव्हाण, पूजा चितळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिंधी कॉलनी रस्त्याच्या डांबरीकरण कामाचा शुभारंभ



दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक सातमधील सिंधी कॉलनी रस्त्याच्या डांबरीकरण कामाचा शुभारंभ माजी नगरसेविका वंदना ताठे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीनुसार या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून यामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होणार आहे. कार्यक्रमास परिसरातील महिला-पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रभागाचे नंदनवन करण्याच्या दृष्टीने माजी नगरसेविका वंदना ताठे यांचे वेळोवेळी भरीव योगदान राहिले आहे. मूलभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पथदिवे आणि नागरी सोयीसुविधांच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या डांबरीकरण कामामुळे सिंधी कॉलनी रस्ता परिसरातील दैनंदिन गैरसोयी दूर होणार असून पावसाळ्यातील समस्या कमी होणार असल्याची नागरिकांमध्ये अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेविका वंदना ताठे म्हणाले की , प्रभागातील प्रत्येक रस्ता, गल्लीतून नागरिकांना सुरक्षित व सुलभ वाहतूक मिळावी, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असून नागरिकांच्या सहकार्याने प्रभाग सातला अधिक सुंदर आणि सुस्थितीत आणण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे,असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी विद्या बोरुडे, मंजुषा गायकवाड, अनिता क्षीरसागर, प्रज्ञा शालिग्राम, दुर्गा लालवणी, सुनीता वरखाडे, माधुरी सोनटक्के, सुनीता शेळके, नीलम मीराणी, वर्षा निरामी, दामोदर बटेजा, अशोक सातपुते, डॉ. खोमणे, गोखले सर, चषमना आसराणी, कुकरेजा साहेब, अमोल गायकवाड, पी. के. देशपांडे, संतोष सातपुते, रमेश कुकरेजा, महेश निराणी, विलासराव ताठे, बाबासाहेब वाकळे, अरुण शिंदे, मयूर ताठे आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते.नागरिकांनी रस्त्याच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत माजी नगरसेविका वंदना ताठे यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. आगामी काळातही प्रभागातील इतर विकासकामे मार्गी लावावीत, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

## पेमराज सारडा महाविद्यालयात भारत सरकार शिष्यवृत्ती विशेष पंधरवडा शिबिराचे आयोजन

# शिष्यवृत्तीचा योग्य वापर केल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य दोन्ही उज्ज्वल होईल-प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती विशेष पंधरवडा शिबिराचे आयोजन पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या विविध शिष्यवृत्तींचा लाभ घेऊन आपले शिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन केले.डॉ. गावित पुढे म्हणाल्या की, आज भारत सरकारच्या अनेक सवलती व शिष्यवृत्ती ऑनलाईन माध्यमातून वेबपोर्टलवर उपलब्ध आहेत. मात्र माहितीअभावी किंवा दिरंगाईमुळे अनेक विद्यार्थी या सुविधांपासून वंचित राहतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना फॉर्म भरणे, कागदपत्रे अपलोड करणे अथवा ऑनलाईन प्रक्रियेत अडचणी येत असतील त्यांनी महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाशी संपर्क साधून योग्य माहिती घ्यावी व संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा.यावेळी शिष्यवृत्ती शिबिराच्या समन्वयक डॉ. सुरेखा गांगुर्डे यांनी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या विविध शिष्यवृत्ती, आवश्यक कागदपत्रे, तसेच विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका व दिरंगाईमुळे होणारे नुकसान याबाबत सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. अशोक असेरी उपस्थित होते. ऑनलाईन फॉर्म भरण्यात अडचण आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवर्जून त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच शिष्यवृत्ती फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेत कोणत्या चुका टाळाव्यात, कोणती कागदपत्रे लॉगिनवर अपलोड करणे आवश्यक आहे, याबाबत श्री. वसंत शिंदे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांचे प्रोफाईल तयार करून प्रत्यक्ष फॉर्म भरून दाखवत त्यांनी प्रात्यक्षिक स्वरूपात मदत केली. या शिबिरास मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. श्री. दिलीप संत्रे यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. शिष्यवृत्ती विशेष पंधरवडा शिबिराबाबत हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव श्री. संजय जोशी, वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. रमेश झरकर, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी आयोजकांचे व मार्गदर्शकांचे कौतुक केले.

# बोरद आरोग्य केंद्रात रेबीज इंजेक्शनचा तुटवडा; नागरिकांचे हाल, माजी उपसभापती विजयसिंग राजपूत आक्रमक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील बोरद परिसरात गेल्या महिन्याभरापासून पिसाळलेल्या कुत्र्यांनी धुमाकूळ घातला असून, आतापर्यंत २० ते २५ नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मात्र, बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात यासाठी प्रतिबंधक रेबीज इंजेक्शनचा तुटवडा असल्याने रुग्णांना उपचारासाठी भटकंती करावी लागत आहे. या गंभीर प्रश्नी पंचायत समितीचे माजी उपसभापती विजयसिंग राजपूत यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे धाव घेऊन तत्काळ इंजेक्शन उपलब्ध करण्याची मागणी एका पत्राद्वारे केली आहे.

बोरद आणि परिसरातील गावांमध्ये पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिक भयभीत आहेत. कुत्र्यांनी चावा घेतल्यानंतर रुग्ण बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी जातात. मात्र, तिथे केवळ पहिला डोस उपलब्ध करून दिला जातो. पुढील डोससाठी आरोग्य केंद्राकडून वरिष्ठ स्तरावरून पुरवठा नाही असे सांगून रुग्णांना तालुका स्तरावर जाण्याचा सल्ला दिला जात आहे.

ग्रामीण भागातील मजुरी करणाऱ्या नागरिकांना पुढील डोससाठी वारंवार तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत आहे. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा खर्च होत असून, वेळेवर उपचार न मिळाल्यास जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. रेबीजचा पहिला डोस मिळतो, पण पुढच्या डोससाठी आम्हाला तालुक्याला का पाठवतात? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.या संदर्भात विजयसिंग राजपूत यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांना पत्राच्या माध्यमातून लेखी निवेदन पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. आता आरोग्य विभाग यावर काय पावले उचलतो, याकडे बोरद परिसरातील जनतेचे लक्ष लागले आहे.



आम्ही पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे कामी ग्रामपंचायत विभागामार्फत प्रयत्न करत आहोत. या कुत्र्यांना पकडून इतरत्र सोडून देण्याचे आम्ही ठरवले असून त्या दृष्टीने कार्य देखील सुरू आहे पिसाळलेले दोन कुत्र्यांचा बंदोबस्त आधीच करण्यात आला असून उर्वरित कुत्र्यांचा बंदोबस्त देखील आम्ही करणार आहोत.

–अनिता भिलाव,लोकनियुक्त सरपंच बोरद ता. तळोदा.

### प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे!

बोरद आरोग्य केंद्रात इंजेक्शनचा पुरवठा कमी असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. पिसाळलेल्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने ही आरोग्य आणीबाणीची स्थिती आहे. प्रशासनाने त्वरित बोरद केंद्रात पूर्ण डोस उपलब्ध करून द्यावेत, अन्यथा नागरिकांच्या आरोग्यासाठी आम्हाला तीव्र पावले उचलावी लागतील.

–विजयसिंग राजपूत,माजी उपसभापती, पं.स. तळोदा.

बोरद येथील आरोग्य केंद्रातील प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, रेबीज डोससाठी तालुका स्तरावर पाठपुरावा केला असून लगेच डोस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे कोणत्याही रुग्णाला तालुकास्तरावर किंवा इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही.

डॉ. कुंजप्रिया पावरा

आरोग्य अधिकारी, आरोग्यवर्धिनी केंद्र. बोरद.

# श्री क्षेत्र माळेगाव येथे १८ ते २४ डिसेंबर दरम्यान श्री खंडेरायाची भव्य यात्रा

## विविध सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

दक्षिण भारतातील प्रसिद्ध आणि सर्वात मोठ्या यात्रांपैकी एक असलेली श्री खंडेरायाची भव्य यात्रा यावर्षी श्री क्षेत्र माळेगाव, ता. लोहा, जि. नांदेड येथे दि. १८ डिसेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही या यात्रेचे आयोजन जिल्हा परिषद नांदेड, पंचायत समिती लोहा व ग्राम पंचायत कार्यालय माळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या यात्रेला महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा व आंध्र प्रदेशातील लाखो भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात.



यात्रेच्या कार्यक्रमांची सुरुवात दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी श्री खंडेरायाच्या पालखी सोहळ्याने होणार असून हा सोहळा भक्तांसाठी विशेष आकर्षण असतो.दि.१९ डिसेंबर रोजी पारंपारिक पशु प्रदर्शन ,दि. २० डिसेंबर रोजी कुस्त्यांची भव्य दंगल दि. २२ डिसेंबर रोजी लावणी महोत्सव दि. २३ डिसेंबर रोजी कला महोत्सव तर दि. २४ डिसेंबर रोजी शंकर पट (बैलगाडा शर्यत) या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमांचे उद्घाटन विविध पक्षातील मान्यवर नेते मंडळी, मंत्री महोदय, खासदार, आमदार, आजी-माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तसेच कार्यकर्ते मंडळी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्तेही उद्घाटन समारंभ पार पडणार आहेत.ही यात्रा धार्मिकतेसोबतच सांस्कृतिक, सामाजिक व पारंपरिक वारशाचे दर्शन घडवणारी असून ग्रामीण भागातील लोककलेला मोठे व्यासपीठ मिळते. यात्रेच्या निमित्ताने परिसरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सामाजिक चैतन्य निर्माण होते.या पार्श्वभूमीवर लोहा तालुक्याचे भूमिपुत्र व पुण्यातील प्रसिद्ध उद्योजक, लोकप्रिय भिमाशंकर मामा कापसे यांनी भाविक व नागरिकांना आवाहन केले आहे की,लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून श्री खंडेरायाच्या यात्रेतील विविध कार्यक्रमांचा आनंद घ्यावा व यात्रेची शोभा वाढवावी.

## भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष पदी नियुक्ती

# नेतृत्वाचे आभार,संघटन बळकटी करणाचा निर्धार–नितीन नबीन

दैनिक वादळ वार्ता

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

विश्वातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल नवनियुक्त अध्यक्षांनी पक्षाच्या शीर्ष नेतृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.या प्रसंगी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, माननीय राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा,माननीय गृहमंत्री अमित शाह तसेच माननीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.तसेच संसदीय दलातील सर्व सन्माननीय सदस्य आणि पक्षाच्या संघटनात्मक पातळी वरील समर्पित कार्यकर्त्यांनी दाखवलेला विश्वास हीच आपल्या साठी मोठी प्रेरणा असून त्याचवेळी मोठे उत्तरदायित्व ही असल्याचे त्यांनी नमूद केले.



आपण संपूर्ण शक्ती, सामर्थ्य व परिश्रमाच्या जोरावर कार्यकर्त्यांसोबत खांद्याला खांदा लावून काम करत पक्षाला अधिक सशक्त,संघटित व प्रगतिशील दिशेने नेण्यासाठी कटिबद्ध असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.सेवा,संघटन आणि समर्पण या त्रिसूत्रीवर चालत सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून 'विकसित भारत' घडविण्याचा मार्ग निश्चितपणे प्रशस्त होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या नियुक्ती मुळे भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीकरणाला नवी दिशा मिळेल,अशी अपेक्षा पक्षातील नेते व कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.दरम्यान भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव श्री. भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र सचिव श्री. धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव श्री. चंद्रकांत पाटील यांनी नितीन नबीन यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्व.शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली; कुटुंबीयांना सांत्वनपर भेट



दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री व पंजाबचे माजी राज्यपाल स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांचे दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. १३ डिसेंबर रोजी लातूर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

दि. १६ डिसेंबर रोजी लातूर येथील त्यांच्या देवघर निवासस्थानी विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी श्री. शैलेश पाटील चाकूरकर व सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना धीर देण्यात आला.

या प्रसंगी प्रा. मनोहरजी धोंडे, विठ्ठलराव ताकबिडे, दत्ताभाऊ खंकरे, इंजि. अनिल माळगे, ज्ञानोबा घोडके, विलास कापसे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाने दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# केज शहरातील शिक्षक कॉलनी चौकास लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे नाव,नगर पंचायत सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर जनतेची मागणी पूर्ण

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज नगरपंचायतच्या इतिहासात दि.१ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी एक अत्यं महत्त्वाचा ठराव मंजूर करण्या आला.शहरातील शिक्षक कॉलन परिसरातील बीड -केज महामार्गावरील चौकास दिवंगत लोकनेते स्व.गोपीनाथरा मुंडे साहेब यांचे नाव देण्याचा बहुप्रतिक्षि ठराव आजच्या नगरपंचायत सर्वसाधार सभेत एकमताने मार्गीलावण्यात आला.य निर्णयामुळे समस्त शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे.




**लोकभावनेचा आदर! पत्रकाराच्या पुढाकाराला यश**

या चौकास लोकनेते स्व.मुंडे साहेबांचे नाव देण्याची मागणी पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते श्री.प्रकाश एकनाथ मुंडे यांनी सर्व प्रथम केली होती.मुंडे साहेबांच्या नुकत्याच झालेल्या जयंतीनिमित्त दि.१२ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी पत्रकार प्रकाश एकनाथ मुंडे आणि त्यांच्या सहकारी युवक मित्रांनी या भागात हा चौक लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चौक म्हणून स्थापित करण्याची मोहीम सुरू केली होती.याच लोकभावनेचा आदर करत,पत्रकार प्रकाश मुंडे यांनी नगरपंचायतकडे रीतसर ठराव दाखल केला होता.त्यांच्या या मागणीला नगर पंचायत सभेमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

**आभार आणि कौतुकाचा वर्षाव**

हा ऐतिहासिक ठराव मंजूर करण्यात मोलाची भूमिका बजावल्याबद्दल शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. या निर्णयासाठी विशेषतः नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड,नगर सेवक बाळासाहेब जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे नेते नगरसेवक डॉ.हारुणभाई इनामदार तसेच,केज नगरपंचायत मधील सर्व पक्षीय नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकारी. पत्रकार प्रकाश मुंडे यांनी सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानताना सांगितले की,आज नगरपंचायतने लोक नेत्यांच्या नावाचा सन्मान करून जनतेच्यामागणीचा आदर केला आहे.यामुळे भावी पिढीला साहेबांचे कार्य प्रेरणा देत राहील. केज-बीड महामार्गावरील या चौकाला मुंडे साहेबांचे नाव मिळाल्याने,केज शहराच्या इतिहासात हा दिवस सुवर्ण अक्षरांनी नोंदवला गेला आहे.

# केज तालुक्यातील चिंचोली माळी घरकुलाचे हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेचे हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे म्हणून रोहन गलांडे पाटील यांनी दि.९ डिसेंबर २०२५ रोजी आमरण उपोषणाचे निवेदन दिले होते व उद्या रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसणार आहेत त्या अगोदरच एक मागणी मान्य केली आहे व केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील घरकुलाचे हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरवात झाली आहे तसेच केज तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचे हप्ते जमासुध्दा करण्यात आले आहे तरी उद्या एक मागणी मान्य झाली असली तरी इतर मागण्या मान्य होत नाहीत त्यासाठी उद्या रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसणार आहेत.केज तालुक्यातील विहीर व गायगोठा,घरकुलाचे हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी रोहन गलांडे यांनी केली होती.त्यांची ही एक मागणी मान्य करण्यात आली आहे.



# सातपुडा गारठला : पारा घसरल्याने जनजीवन विस्कळीत

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी शहरासह तालुक्यात कडाक्याच्या थंडीची लहर आली असून शहरासह तालुक्यात व सातपुड्याच्या गावपाड्यांमध्ये हुडहुडी भरली असून नागरिकांनी गरम कपड्यांकडे मोर्चा वळविला आहे.

मोलगी शहरासह तालुक्यात थंडीची लहर आली असून वातावरणात कमालीचा गारठा वाढल्याने सातपुड्याला हुडहुडी भरली आहे. शहरासह तालुक्यात सकाळी व संध्याकाळी वातावरणात कमालीचा गारठा निर्माण होत असल्याने सातपुड्यातील गाव पाड्यांवर रात्री शेकोट्या पेटू लागले आहेत वाढलेल्या थंडीमुळे नागरिकांनी आपल्या गरम कपड्यांकडे आपला मोर्चा वळवला आहे.



सातपुड्यात थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेल्या डाब सह परिसरात थंडीचे प्रमाण वाढलेले असून सातपुड्यात हुडहुडी भरली आहे सातपुड्यासह नर्मदा काठापर्यंत थंडीची लाट आली आहे.सातपुड्यात यावर्षी पर्जन्यमान अधिक असल्याने थंडीचे प्रमाणही अधिक असेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे सातपुड्यात थंडीचे प्रमाण वाढल्यास वातावरणाच्या पारा कमालीच्या खाली जाऊन कडाक्याचे थंड वातावरण होऊन सातपुडा गारठतो अनेक ठिकाणी दवबिंदू गोठून बर्फ साचतो.

सातपुड्याला थंडीची हुडहुडी भरली असून सातपुड्यातील थंड हवेचे ठिकाण असलेल्या (हेलो दाब) डाब परिसरात दवबिंदू गोठण्याची स्थिती निर्माण झाली आहे. कमालीच्या गारठ्यामुळे या परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

# केज पंचायत समिति येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत जीपीडीपी आराखडा २०२६-२७ साठी एक दिवशीय प्रशिक्षण शिबिर संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी पंचायत समिती केज येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत जीपीडीपी आराखडा २०२६-२७ साठी प्रशिक्षण आयोजन करण्यात आले.यामध्ये कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.चौरे सर विस्तार अधिकारी (पंचायत) व संवाद श्री.रोडेवाड सर विस्तार अधिकारी (पंचायत) ,श्री.मस्के सर विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी केले.तसेंच संपुर्ण मार्गदर्शन श्री.धाकपाडे सर व श्री. पिंपरीकर सर यांनी केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. विठ्ठल नागरगोजे सर यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण टीएमपी पोर्टल वर माहिती भरण्याचे काम श्री.शेख सर,श्री. सरवदे.एस.व्ही.(बीएम) व अरुण बनसोडे (लेखा सहायक )यांनी केले. अशाप्रकारे एक दिवसाची कार्यशाळा अतिशय आनंदात पार पडली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077